**भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतार दिन यांचा भाद्रपद शुध्द द्वितीया हा दिवस "अवतार दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : क्र.जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/ कार्या-जपुक**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २३ एप्रिल, २०२६.

**संदर्भ**:- शासन परिपत्रक क्रमांक : क्र.जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/ कार्या-जपुक,दि.२९.१२.२०२५

**प रि प त्र क**

सन २०२६ मध्ये राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत संदर्भाधीन दिनांक २९ डिसेंबर, २०२५ अन्वये शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. सदर परिपत्रकातील अनुक्रमांक २९ वर भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी"अवतार दिन" रविवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०२६ रोजी साजरा करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. तथापि, महानुभाव तत्वज्ञानानुसार भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी हे परमेश्वराचे अवतार असल्याने त्यांचा "अवतार दिन" साजरा करण्याबाबत **स्वतंत्र** परिपत्रक निर्गमित करावे अशा स्वरुपाची मागणी करण्यात आली आहे. सदर मागणीस अनुसरुन तसेच महानुभाव पंथ प्रवर्तक भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी १२ व्या शतकात सत्य, अहिंसा, मानवता, समानता हे जागतिक मूल्ये समाजाला दिली. भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान, मानवतावादी कार्य, अलौकिक मराठी साहित्य आणि सामाजिक योगदानाची माहिती संपूर्ण विश्वाला होत असून स्वामींच्या विचारांचा सर्वत्र जागर होत आहे. **भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामीं यांच्या कार्याचा गौरव म्हणून भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचा भाद्रपद शुध्द द्वितीया हा दिवस "अवतार दिन" तिथीनुसार दिनांक १३.०९.२०२६ रोजी साजरा करण्यात यावा.**

**सदर शासन परिपत्रक सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयाबरोबरच राज्यातील सर्व महाविद्यालये व सर्व शाळा यांनाही लागू राहील.**

**सदरचा "अवतार दिन" साजरा करताना कोणते कार्यक्रम आयोजित करावेत, याबाबत, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यावर स्वतंत्ररित्या सूचना निर्गमित करण्यात येतील.**

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०४२३१५२२१०२९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2026.04.23 15:23:03 +05'30'

**( हेमंत महाजन )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. उप मुख्यमंत्री ( नगरविकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (उत्पादन शुल्क, अल्पसंख्याक विकास व क्रीडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७. प्रधान सचिव (प्र.ना.उ.सु.), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
११. सह सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
१३. सर्व विभागीय आयुक्त.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१७. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
१८. निवड नस्ती ( कार्यासन-२९).